# शिंदे देशमुख टेक्निकल इन्स्टिटयुट सातारा

विषय :- फिटर

---

## मुलाखतीची संभाव्य प्रश्नोत्तरे.

1. कारखान्यामध्ये जोडणीची कामे कोणत्या ट्रेडच्या कामगाराकडून घेतली जातात?

➢ फिटर या ट्रेडच्या कामगाराकडून

2. फिटरचे वेगवेगळे प्रकार सांगा.

➢ 1) बेंच फिटर 2) असेंब्ली फिटर 3) पाईप फिटर

3. प्रथमोपचार म्हणजे काय?

➢ कंपनीमध्ये काम करीत असताना निष्काळजीपणामुळे अपघात होतो त्यावेळी अपघातग्रस्त व्यक्तीस त्वरित आराम मिळावा, डॉक्टरच्या उपचारापूर्वी करावयाच्या उपचारास प्रथमोपचार असे म्हणतात.

4. 5 S ही संकल्पना कोणत्या देशाने मांडली?

➢ जपान या देशाने मांडली, अवलंबिली.

5. भारतीय मानक संस्थेचा फुलफॉर्म सांगा.

➢ I.S.O. - इंटरनॅशनल स्टॅण्डर्डएशन ऑर्गनायझेशन

6. 1 फूट बरोबर किती इंच?

➢ 12 इंच

7. 1 इंच = 25.40 मि.मि.

8. ट्रॅमल हे साधन कोणत्या कामासाठी वापरतात?

➢ जास्त व्यासाचे वर्तुळ काढण्यासाठी व मार्कींग करण्यासाठी याचा उपयोग होतो.

9. कॅलिपरचे जॉईन्टवरून पडणारे प्रकार सांगा.

➢ फॉर्म जॉईंट व स्प्रिंग जॉईंट

10. कॅलिपरचे प्रकार सांगा.

➢ आऊटसाईड कॅलिपर, इन्साईड कॅलिपर, ऑड लेग कॅलिपर

11. पंचचे प्रकार सांगा.

➢ प्रिंक पंच- 30°, डॉट पंच- 60°, सेंटर पंच- 90°

12. हॅमरचे पेनवरून पडणारे प्रकार सांगा.

➢ १) बॉल पेन हॅमर २) स्ट्रेट पेन हॅमर ३) क्रॉस पेन हॅमर

13. हॅमरचा हॅण्डल लाकडी का वापरतात?

➢ लाकूड हादरे सहन करते म्हणून.

14. व्ही ब्लॉक कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ व्ही ब्लॉक कास्ट आयर्न किंवा कास्ट स्टीलपासून बनवितात.

15. व्ही ब्लॉकचा स्लॉटचा कोन व उपयोग सांगा.

➢ 90°मध्ये असतो व गोलाकार जॉबला आधार देण्यासाठी त्याचा उपयोग करतात.

16. मार्कींग टेबल कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ क्लोज ग्रेनेड कास्ट आयर्नपासून बनवितात.

17. बेंच व्हाईसचा उपयोग सांगा.

➢ फिटर विभागात, फायलिंग, चिपिंग, हेक्सॉईग, टॅपिंग करताना जॉब पकडताना होतो.

18. व्हाईसचे प्रकार सांगा.

➢ 1)बेंच व्हाईस 2)मशीन व्हाईस 3)पाईप व्हाईस 4) हॅण्ड व्हाईस 5) लेग व्हाईस 6) पीन व्हाईस

19. C क्लॅम्पचा उपयोग सांगा.

➢ वेगवेगळया प्लेटा जॉब घट्ट पकडण्यासाठी याचा उपयोग होतो.

20. स्पॅनर्स कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ कास्ट स्टील, हाय कार्बन स्टील, अलॉय स्टील इ.पासून बनवितात.

21. मापाचे प्रकार सांगा.

➢ लिनियर माप, अॅंग्युलर माप, रेडियल माप, प्लेन माप इ.

22. स्टील रूळ कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ स्प्रिंग स्टील व स्टेनलेस स्टील पासून बनवितात.

23. आऊट साईड कॅलिपर कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ हाय कार्बन स्टील व माईल्ड स्टील पासून बनवितात.

24. ट्रायस्क्वेअरव्दारे जॉबचे कोणकोणते चेकींग करता येते?

➢ चेंकींग व मार्कींग जॉबचा फ्लॅटनेस व स्क्वेअरनेस चेक करता येतो.

25. ट्रायस्क्वेअर कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ ब्लेड-हाय कार्बन स्टील व स्टॉक- कास्ट आयर्न पासून बनवितात.

26. ट्रायस्क्वेअरचे प्रकार सांगा.

➢ 1)फिक्स्ड ट्रायस्क्वेअर 2) अॅडजेस्टेबल ट्रायस्क्वेअर

27. मार्कींग मिडिया करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी वापरतात?

➢ चुना, खडू, पर्शियन ब्ल्यू इ.

28. स्क्रायबरचा उपयोग व टोकाच्या पॉईंटचा कोन किती असतो?

➢ स्क्रायबरचा उपयोग मार्कींग करण्यासाठी व 12° ते 15° ग्रायडींग केलेला असतो.

29. सेंटर पंच चा उपयोग सांगा.

➢ सेंटर पंच छिद्र पाडण्यापूर्वी पंचिंग करण्यासाठी होतो.

30. बेंच व्हाईस कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ कास्ट आयर्न या धातूपासून बनवितात.

31. हेक्सॉ ब्लेडचा सेटींगवरून पडणारे प्रकार सांगा.

➢ सिंगल, डबल, झिगझॅग इ.

32. अॅंगल प्लेटचा उपयोग सांगा.

➢ जॉबवर मार्कींग करताना काटकोनामध्ये आधार देण्यासाठी याचा उपयोग होतो.

33. फाईलच्या कटावरून प्रकार सांगा.

- 1)सिंगल कट 2)डबल कट 3)कर्व्हकट 4) राप्स कट

34. ड्रॉ फाईलसाठी कोणती फाईल वापरतात?

- सिंगल कट फाईलचा उपयोग करतात.

35. मार्कींग करण्यासाठी आधार देण्यासाठी कोणते साधन वापरतात?

- ॲंगल प्लेट वापरतात.

36. चिझलचे प्रकार सांगा.

- हॉट चिझल व कोल्ड चिझल.
  हॉटमध्ये प्रकार पडत नाहीत. कोल्ड चिझलमध्ये 1)फ्लॅट चिझल 2)क्रॉस कट चिझल 3)हाफ राऊंड नोज चिझल 4) डायमण्ड पॉईंट चिझल 5) साईड चिझल 6) काऊमाऊथ चिझल

37. चिझल कोणत्या धातूपासून बनवितात व आकार कसा असतो?

- चिझल हे कटींग टूल असल्यामुळे हाय कार्बन स्टीलपासून बनवितात व त्याचा आकार षटकोनी व अष्टकोनी आकार असतो.

38. हेक्सॉ फ्रेमचे प्रकार सांगा.

- 1) फिक्स्ड हेक्सॉ फ्रेम 2)ॲडजेस्टेबल हेक्सॉ फ्रेम 3)डीप कटींग फ्रेम

39. हेक्सॉ ब्लेड कोणत्या धातूपासून बनवितात?

- हाय कार्बन स्टील, हाय स्पीड स्टील, अलॉय स्टील पासून बनवितात.

40. हेक्सॉ ब्लेडचे प्रकार सांगा.

- 1) फ्लेक्झिबल 2)आल हर्ड 3)फ्लेक्झिबल सेंटर 4) स्प्रिंग बॅक

41. ग्रेडवरून पडणारे ब्लेडचे प्रकार सांगा.

- कोर्स मिडियम फाईन, वेरी फाईन इ.

42. फायलिंगच्या पध्दती सांगा.

- 1) स्ट्रेट फायलिंग 2) क्रॉस फायलिंग 3) ड्रॉ फायलिंग 4) कर्व्ह फायलिंग

43. फाईलचे पिनिंग म्हणजे काय?

- फाईच्या दातांमध्ये धातूचे लहान -लहान कण अडकणे त्याला फाईलचे पिनिंग म्हणतात.

44. ड्रील कोणत्या धातूपासून बनवितात?

- ड्रील हाय कार्बन स्टील व हाय स्पीड स्टील पासून बनवितात व त्याला हार्डनिंग टेपरींग करतात.

45. फ्लॅट ड्रीलचा ॲंगल किती असतो?

- 90° असतो

46. ट्वीस्ट ड्रीलचा ॲंगल किती असतो?

- 118° असतो

47. ड्रीलच्या शॅंकवरून पडणारे प्रकार सांगा.

- 1) स्ट्रेट शॅंक 2) टेपर शॅंक 3) स्क्वेअर शॅंक

48. ड्रीलींग मशीनवर ड्रील पकडण्याची साधने सांगा.

- 1)ड्रील चक 2) स्लीव 3) सॉकेट 4) ड्रील ड्रीफ्ट

49. ड्रीलींग मशीनवर जॉब पकडण्याची साधने सांगा.

- 1)मशीन व्हाईस 2)स्टेप ब्लॉक 3)व्ही ब्लॉक 4)ॲंगल प्लेट पॅरलल ब्लॉक 5)C क्लॅम्प 6)टी बोल्ट

50. ड्रीलींग मशीनचे प्रकार सांगा.

- हॅण्ड ड्रीलींग मशीन + पॉवर ड्रीलींग मशीन
  1) हॅण्ड ड्रीलींग मशीन 2) ब्रीस्ट ड्रीलींग मशीन 3) रॅचेट ब्रेस ड्रीलींग मशीन
  1) पोर्टेबल इलेक्ट्रिक ड्रीलींग मशीन 2)बेंच ड्रीलींग मशीन 3)सेंसिटिव्ह ड्रीलींग मशीन
  4) पिलर ड्रीलींग मशीन 5)रेडियल ड्रीलींग मशीन 6)मल्टी स्पिण्डल ड्रीलींग मशीन
  7) गॅंग ड्रीलींग मशीन

51. ड्रीलींग मशीन मशीनवर कोणकोणती ऑपरेशन केली जातात?

- 1) ड्रीलींग 2) काऊंटर बोरिंग 3) काऊंटर सिकिंग 4)स्पॉट फेसिंग 5) रिमिंग 6) टॅपिंग इ.

52. कटींग स्पीड काढण्याचे सूत्र सांगा.

- $CS = \frac{\pi \theta N}{1000}$ CS = कटींग स्पीड N = RPM $\pi$ = 22/7
  D = ड्रिलचा डायमीटर (एकक मीटर/ मिनिट.)

53. ॲल्युमिनीयम व तांबे यासाठी कोणते कुलंट वापरतात?

- केरोसिन (रॉकेल) हे कुलंट वापरतात.

54. रिमरचा उपयोग सांगा.

- रिमर एक कटींग टूल असून याचा ड्रील होल मोठे करणे व फिनिशींग करण्यासाठी होतो.

55. रिमर कोणत्या धातूपासून बनवितात?

- रिमर हे हाय कार्बन स्टील व हाय स्पीड पासून बनवितात.

56. रिमरचे प्रकार सांगा.

- 1) हॅण्ड रिमर 2) मशीन रिमर
  1) हॅण्ड रिमर :-
  1)पॅरलल रिमर 2) टेपर रिमर 3) ॲडजेस्टेबल रिमर 4) एक्पांशन रिमर 5) पायलट रिमर
  2) मशीन रिमरः-
  1)रोज रिमर 2) शैल रिमर 3) मशीन ब्रीज रिमर 4) मशीन जिग रिमर

57. टॅप चा उपयोग सांगा.

- टॅप पचा उपयोग जॉबच्या आतील भागावर आटे पाडण्यासाठी केला जातो.

58. टॅप कोणत्या धातूपासून बनवितात?

- टॅप हाय कार्बन स्टीलपासून बनवितात. त्याला हार्डनिंग व टेंपरींग केले जातात.

59. टॅपचे प्रकार सांगा.

- 1) हॅण्ड टॅप 2) मशीन टॅप 3) एक्सटेन्शन्स टॅप 4) मास्टर टॅप 5) मशीन स्क्रू टॅप 6) नट टॅप

60. टॅप डील साईज काढण्याचे सूत्र सांगा.

- T.D.S. = Tap size – 2 d (d= 0.61P)

61. टॅप पकडण्यासाठी कशाचा वापर करतात?

➢ टॅप रेंजचा वापर करतात.

62. टी.पी.आय. म्हणजे काय?

➢ थ्रेड पर इंच म्हणजेच 1 इंचामधील दात्यांची संख्या होय.

63. टॅप रेंजचे प्रकार सांगा.

➢ 1) सॉलिड टॅप रेंज 2) ॲडजस्टेबल टॅप रेंज

64. टॅपचे प्रकार सांगा.

➢ 1) टेपर टॅप 2) मिडियम टॅप 3) बॉटमिंग टॅप

65. टॅप तुटण्याची कारणे द्या.

➢ 1) टॅप साईज प्रमाणे ड्रील न मारणे
2) मारलेलं होल टेपर मध्ये असल्यामुळे
3) टॅपवर अधिक दाब देणे
4) टॅप काटकोनामध्ये न पकडणे
5) टॅपिंग करताना ल्युब्रिकेंट वर न करणे
6) जॉब व्हाईसमध्ये घटट न पकडणे
यामुळे टॅप तुटू शकतो.

66. तुटलेल्या टॅप बाहेर काढण्याच्या पध्दती कोणत्या?

➢ 1) जर टॅप जॉबच्या वरील पृष्ठभागावर तुटलेली असेल तर तो प्लायरने पकडून बाहेर काढणे.
2) सरफेस समान असेल तर पंच व हॅमरच्या सहाय्याने बाहेर काढता येतो.
3) स्टड एक्स्ट्रॅक्टर व्दारे तुटलेला टॅप बाहेर काढता येतो.

67. डायचा उपयोग सांगा.

➢ जॉबच्या बाहेरील भागावर अरे पाडण्यासाठी डायचा उपयोग करतात.

68. डाय कोणत्या धातूपासून बनवितात?

➢ डाय कार्बन स्टीलपासून बनवितात. हार्डनिंग व टेंपरींग करतात.

69. डायचे प्रकार सांगा.

➢ 1) सॉलिड डाय
2) स्प्लिट डाय
3) टू-पीस डाय
4) डाय नट
5) डाय प्लेट

70. डाय पकडण्याचे साधन कोणते?

➢ डाय स्टॉक हे डाय पकडण्याचे साधन आहे.

71. स्क्रेपरचे प्रकार सांगा.

➢ 1) फ्लॅट स्क्रेपर
2) हाफ राऊंड स्क्रेपर
3) ट्रॅंग्युलर स्क्रेपर हे आहेत.

72. स्क्रेपरचे उपयोग सांगा.

- अधिक अचूकतेमध्ये जॉब फिनिशींग करण्यासाठी व जॉबवरील लहान-लहान उंचवटे काढण्यासाठी याचा उपयोग होतो.

73. धातूचे यांत्रिक गुणधर्म कोणकोणते?

- कठीणपणा, ठिसूळपणा, तंतुभवनशीलता, हर्डनेस, टफनेस इ.

74. आऊटसाईड मायक्रोमीटरचा उपयोग व लिस्ट काऊंट सांगा.

- जॉबचा बाहेरील भाग चेकींग करणे व 0-01 MM इतका लिस्ट काऊंट आहे.

75. आऊटसाईड मायक्रोमीटर कोणकोणत्या तत्वावर काम करतो?

- आऊटसाईड मायक्रोमीटर हा नट बोल्टच्या, स्क्रू-थ्रेडच्या तत्वावर काम करतो.

76. आऊटसाईड मायक्रोमीटर कोणकोणत्या रेंजमध्ये उपलब्ध असतात?

- 0-25, 25-50, 50-75, 75-100, 100-125 पर्यंत.

77. इन्साईड मायक्रोमीटरचा उपयोग सांगा.

- जॉबचा आतील भाग चेकींग करणेसाठी होतो.

78. डेप्थ मायक्रोमीटरचा उपयोग सांगा.

- जॉबचा स्लॉट, होलची खोली चेक करण्यासाठी होतो.

79. इलेक्ट्रीक सप्लायपासून आग लागल्यास कोणते Fire Extingwisher वापरतात?

- सोडा ॲसिड एक्स्टींगविशर.

80. तेलापासून लागलेली आग विझविण्यासाठी कोणते Fire Extingwisher वापरतात?

- फोम एक्स्टींगविशर.

81. हॅंड टूल्स म्हणजे काय?

- जे टूल्स हाताने वापरतात, त्यास हॅंड टूल्स असे म्हणतात.

82. मेट्रीक पध्दतीचे मूळ परिमाण कोणते?

- मीटर

83. डायरेक्ट मेजरमेंट म्हणजे काय?

- ज्या साधनाने प्रत्यक्ष मापे घेता येतात, त्याला डायरेक्ट मेजरमेंट असे म्हणतात.

84. स्टील रूळ किती लांबीची असते?

- ही पट्टी 30 ते 60 सें.मी. लांबीची असते.

85. मायक्रोमीटरचे प्रकार सांगा.

- आऊटसाईड मायक्रोमीटर, इन्साईड, डेप्थ इ.

86. व्हर्निअर हाईट गेजचा उपयोग सांगा.

- व्हर्निअर हाईट गेजच्या सहाय्याने जॉबवर मार्कींग व चेकींग करता येते.

87. जॉबवर कोन टाकण्यासाठी काय वापरतात?

- प्रोट्रॅक्टर

88. जॉबचा पृष्ठभाग तपासण्यासाठी कोणते साधन वापरतात?

➢ डायल टेस्ट इंडिकेटर

89. जॉब व मार्कींग टूल एकाच पातळीत राहण्यासाठी कोणत्या साधनाचा वापर करतात?

➢ सरफेस प्लेस

90. व्ही ब्लॉकचा उपयोग सांगा.

➢ जेव्हा दंडगोलाकार भागावर आखणी करण्यासाठी, जॉब स्थिर राखण्यासाठी व्ही ब्लॉकचा वापर करतात.

91. स्क्रायबरचा उपयोग सांगा.

➢ हे टोकदार हत्यार असून जॉबवर पेन्सिलचा वापर न करता रेषा मारण्यासाठी याचा उपयोग करतात.

92. पंचचा उपयोग सांगा.

➢ मार्कींग स्पष्ट दिसावे म्हणून खुणा करण्यासाठी पंचचा वापर करतात.

93. कॅलिपरचे प्रकार सांगा.

➢ आऊटसाईड कॅलिपर, इन्साईड कॅलिपर ऑड लेग कॅलिपर.

94. गेजेसचे प्रकार सांगा.

➢ प्लग गेज, रींग गेज, स्नॅप, थ्रेड गेज, रेडिअस गेज, स्क्रू पिच गेज, वायर गेज.

95. होल्डींग टूलचा उपयोग सांगा.

➢ काम करीत असताना जॉब पकडून ठेवण्यासाठी या टूल्सचा उपयोग करतात.

96. बेंच व्हाईसची लांबी सांगा.

➢ 75 मि.मी. ते 150 मि.मी. पर्यंत असते.

97. पाईप व्हाईसचा उपयोग सांगा.

➢ यामध्ये गोलाकार पार्ट फिटींग करण्यासाठी पाईप व्हाईस वापरतात.

98. मशीन व्हाईस मशीनमध्ये कशा पध्दतीने बसवितात?

➢ हा मशीनच्या टेबलवर फिक्स करतात. त्यासाठी नट बोल्टच्या सहाय्याने मशीनच्या टेबलवर बसवितात.

99. चिझलचा उपयोग सांगा.

➢ जॉबवरील उंचवटे काढून जॉबचा पृष्ठभाग सर्वसाधारण करण्यासाठी चिझलचा उपयोग करतात.

100. चिझलच्या सहाय्याने ऑपरेशन करतात, त्यास काय म्हणतात?

➢ चिपिंग

101. हॅक्सॉचा उपयोग सांगा.

➢ वर्कशॉपमध्ये कोणतेही जॉब कटींग करण्यासाठी हॅक्सॉचा उपयोग होतो.

102. गेजेसचे प्रकार सांगा.

➢ प्लग गेज, रींग गेज, स्नॅप गेज, फिलर, रेडिअस, वायर, स्क्रू पिच गेज इ.

103 वर्कशॉपमध्ये काम करताना कोणती सुरक्षितता बाळगावी?

➢ कामानुसार सुरक्षा साधणे, सेफ्टी शूज, सेफ्टी गॉगल, हॅण्ड ग्लोव्हज आणि ॲप्रॉन.